डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे

# बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे – ४

## विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

## दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती २०२१ -२२

(Post-matric Scholarship for Students with Disabilities) 2021-22

केंद्र शासनाच्या दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती २०२१ -२२ योजना सुरू केलेली ज्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे व विद्यार्थ्याचे पालकांचे उत्पन्न २.५ लाखापेक्षा कमी आहे असे विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात. अशा पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी खालील संकेतस्थळावर दिलेल्या सूचनेचे पालन करून User Id व Login तयार करून online अर्ज भरावा. ऑनलाईन अर्ज हा खालील वेबसाईटवर Ministry of Minority Affairs च्या अंतर्गत Post-matric Scholarship for Students with Disabilities भरावा. भरलेला अर्ज **दि. १५ नोव्हेंबर ,२०२१** पूर्वी भरून त्याचे प्रिंट आउट काढून त्या सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडून महाविद्यालयाच्या कार्यालयात स. १०.३० ते १.३० या वेळेत जमा करावा. अपूर्ण भरलेला अर्ज व अपूर्ण कागदपत्रे स्वीकारला जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**www.scholarships.gov.in**

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे स्कन करून ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे. शासनाने विहित केलेल्या मुदतीत जे विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती २०२१ -२२ लाभ घेता येणार नाही. तरी पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज भरणे अनिवार्य आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे** १) सक्षम अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला/ समाजाचा दाखला , २) सक्षम अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला, ३) आधार कार्ड, ४) पासबुक, ५) रहिवासी दाखला, ६) मागील वर्षीची गुणपत्रिका, ७) चालू वर्षाची प्रवेश फी पावती, ८) महाविद्यालयाचे बोनाफाईड, ९) पासपोर्ट आकाराचा अर्जदाराचा फोटो १०) विद्यार्थ्याचा अपंगत्वाचा दाखला.

प्राचार्य

प्रभारी प्राचार्य
बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय
(स्वायत्त)
पुणे-४११००४.

दिनांक :

उपरोक्त शिष्यवृत्ती च्या पात्रता अटी
https://scholarships.gov.in/public/schemeGuidelines/DEPDGuidelines.pdf
या वेबसाईट वर आहेत